**<u>परिपत्रक क्रमांक 300 दिनांक 26/2/2002</u>**

**<u>विषय :- रोजनामा तारखेवार लिहण्याबाबत</u>**

असे निदर्शनास आले आहे की, अनेक वेळा न्यायिक प्रकरणात रोजनामा तारखेवार लिहीला जात नाही. तरी धर्मादाय संघटनेतील सर्व अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, न्यायिक प्रकरणात मुख्यत्वेकरुन वादात्मक प्रकरणात रोजनामा तारखेवार लिहीण्यात यावा. तसेच प्रत्येक तारखेच्या रोजनाम्यावर संबंधीत अधिकाऱ्याने सही करावी तसेच निशाणी नंबर क्रमवार घ्यावेत. एखादया कागदपत्रावर, दस्तऐवजावर निशाणी नंबर देण्याचे नजरचुकीने राहून गेले असल्यास "+", "¤É" असे नंबर न देता ते क्रमवार घ्यावेत. रोजनामा प्रकरणाचा आरसाच असल्यामुळे तो काळजीपूर्वक लिहीण्यात यावा. तारखेनुसार प्रकरण बोर्डावर घेण्यात यावे व जर पक्षकारांनी तारखेपूर्वी प्रकरण बोर्डावर घेण्याकरिता अर्ज केल्यास प्रथम त्या अर्जावर आदेश करुन नंतरच प्रकरण बोर्डावर घेण्यात यावे.

जर विश्वस्तांनी एकापेक्षा जास्त फेरफार अहवाल एकाच वेळेस दाखल केले तर त्यांचेकडून इंडेक्स तयार करुन घेणे व जर एकाच वेळेस फेरफार अहवाल व हिशोबपत्रके एकत्र दाखल केली तर संबंधीत कर्मचाऱ्याने ताबडतोब ती वेगवेगळी करुन संबंधीत कर्मचाऱ्यांकडे पाठवावीत. जेणेकरुन कार्यालयातील कामकाज पध्दतीत सुसुत्रता येईल.

(के. पी. जोशी)
धर्मादाय आयुक्त,(प्र.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक :- 26/2/2002
प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
पूणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती
धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई
सहायक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/रायगड/अहमदनगर/
जळगांव/धुळे/जालना/परभण्ी/नांदेड/बीड/उस्मानाबाद/भंडारा/यवतमाळ/
चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अकोला/बुलढाणा.